## नियमित दिवाणी दावा क्र. ३३/२०२० मधील नि.क्र. २१ वरील आदेश

(CNR NO. MHRG14)

१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र. १, ३/१ ते ३/३ यांनी दाव्यास कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

२. वादीने सदर अर्जावर म्हणणे देवून हरकत घेतलेली आहे. वादींचे असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा सदरचा अर्ज बनावट व खोटया स्वरुपाचा आहे. प्रतिवादीने दिलेली कारणे खोटी व बनावट असल्याने सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा व मंजूर केल्यास जास्तीत जास्त कॉस्टसह करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

४. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हक्क प्रस्थापनेकरीता, वाटपाकरीता आणि निरंतचे हुकूमाकरीता दाखल केला आहे. सदर प्रतिवादी यांना समन्सची बजावणी झालेनंतर कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे वकीलांशी संपर्क साधता आला नाही. लॉकडाउन शिथिल झालेनंतर दाव्यास कैफियत व म्हणणे देणेकरीता लागणारी आवश्यक कागदपत्र विहीत मुदतीत उपलब्ध न झाल्याने सदर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे.

५. सदर प्रतिवादी हे त्यांची कैफियत दाखल करुन दाव्यास विरोध करत असून त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी तसेच प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता व सदर दाव्याचा निकाल गुणदोषांवर लावणेकरीता सदर प्रतिवादींना

झालेला विलंब माफ करुन त्यांची कैफियत अभिलेखावर घेणे योग्य होईल. सदर प्रतिवादी यांनी त्यांची कैफियत विलंबाने दिली असल्यामुळे जो असोइस्करपणा झाला त्याकरीता सदर प्रतिवादी  यांस खर्च लावून त्यांचा अर्ज मंजूर केल्यास योग्य व संयुक्तिक होईल.  करीता वरील बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | प्रतिवादी क्र. १, ३/१ ते ३/३ यांचा अर्ज रक्कम रु. ५००/- च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २ | सदर प्रतिवादी यांनी रक्कम रु. ५००/- वादी यांना देण्यात यावी. |
| ३ | सदर खर्चाची रक्कम प्रतिवादींनी पुढील नेमल्या तारखेच्या आत वादींना द्यावी अन्यथा सदरचा आदेश रद्द समजणेत येईल. |

ठिकाण – उरण (निलेश म. वाली)

दिनांक –  २०.१०.२०२३ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.